University of Mumbai

परीक्षा विभाग/निकाल कक्ष
महात्मा ज्योतीराव फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई – ४०००९८

क्र.परीक्षा/निकाल कक्ष/ 402 /२०१५

परिपत्रक :—

मुंबई विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/विद्यापीठ संचालित कला, वाणिज्य, विज्ञान व व्यवस्थापन, महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यापीठाच्या दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी उपकेंद्रांचे समन्वय व विद्यापीठाच्या ठाणे उपकेंद्राचे मानद सल्लागार यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, प्रथम सत्र २०१५ च्या परीक्षांसाठी ज्या अभ्यासक्रमांचे/शिक्षणक्रमाचे परीक्षाअर्ज M.K.C.L. या अभिकरणामार्फत Digital University Portal वरून Online घेण्यात आलेले आहेत; अशा सर्व अभ्यासक्रमांच्या/शिक्षणक्रमांच्या परीक्षांसाठी प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांची पात्रता निश्चित (Eligibility Confirmation) करून त्याचा तपशील (Status) व विद्यार्थ्यांचे प्रथम व द्वितीय वर्षाच्या परीक्षांचे (सत्र परीक्षा १ ते ४) चे उत्तीर्ण व अनुत्तीर्ण बाबतचा तपशील (Lower Examination Report Status with Grade & Grade Point ) त्वरीत Digital University Portal वर नोंदवावेत.

पुढे असेही कळविण्यात येते की, ज्या विद्यार्थ्यांचे पात्रतेबाबतचा तपशील व सत्र परीक्षा १ ते ४ च्या उत्तीर्ण व अनुत्तीर्ण बाबतचा तपशील (Lower Examination Report Status with Grade & Grade Point ) Digital University Portal वर नोंदवला नसेल अशा विद्यार्थ्यांचे निकाल राखीव ठेवण्यात येतील.

तसेच विद्यार्थ्यांची संभाव्य गैरसोय टाळण्याची दृष्टीने संबंधीतांना पुन्हा असेही कळविण्यात येते की, विद्यार्थ्यांची पात्रता निश्चित झालेली आहे व विद्यार्थी सत्र १ ते ४ च्या परीक्षा उत्तीर्ण आहे असा एकही विद्यार्थ्यांचा तपशील Digital University Portal वर नोंदविणे बाकी राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

तरी वरील सर्व बाबींची संबंधीतांनी नोंद घेऊन योग्य ती पुढील कार्यवाही करावी.

(दिनेश भोंडे)
परीक्षा नियंत्रक

मुंबई – ४०००९८
दि. २ मे, २०१५

प्रति :—
संचालक/प्रमुख, विद्यापीठाचे विविध शैक्षणिक विभाग
प्राचार्य, विद्यापीठाशी संलग्नित/विद्यापीठ संचालित कला, वाणिज्य, विज्ञान व व्यवस्थापन महाविद्यालये
प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाचे दुर व मुक्त अध्ययन संस्था
संचालक, मान्यताप्राप्त संस्था
समन्वय, रत्नागिरी उपकेंद्र
मानद सल्लागार, ठाणे उपकेंद्र

अ. प्रत माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
संचालक, संगणकीय सुविधा केंद्र, परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ.

ब. प्रत माहितीस्तव अग्रेषित :—
१. समन्वयक व उपकुलसचिव, हस्तलिखीते विभाग
२. उपकुलसचिव, मध्यवर्ती मुल्यांकन केंद्र/नोंदणी व प्रात्रता विभाग/संलग्नता विभाग

क. प्रत माहितीस्तव अग्रेषित :—
१. संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, मुंबई विद्यापीठ.
२. मा. कुलगुरू, यांचे कार्यकारी सचिव
३. मा. प्र.कुलगुरू, यांचे स्विय सहायक
४. मा. संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ यांचे स्विय सहायक
५. कुलसचिव, यांचे स्विय सहायक